महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :** 1442(2)(2)/2019/ तेवीस **बैठक क्रमांक :** -- **दिनांक :** 18 जून, 2022

**प्रति ,**

**BHOSALE SANDIP SUNIL (0040081901071900404)**

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-2019 (पोलीस उपनिरीक्षक) शिफारशीबाबत.**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-2019 (पोलीस उपनिरीक्षक) या परीक्षेच्या दिनांक 1 जून, 2022 रोजी जाहीर झालेल्या अंतिम निकालानुसार आपली पोलीस उपनिरीक्षक, अराजपत्रित, गट-ब या पदाकरीता, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, (पोल-5-अ), मंत्रालय, मुंबई-400 032 यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे.

2. आपण अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने विहित वयोमर्यादा, विहित केलेली आवश्यक शैक्षणिक अर्हता, मराठीचे ज्ञान, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (NCL Certificate) तसेच, सामाजिक व समांतर आरक्षण विषयक दावे आपल्या मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासले असून सदर दावे प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील व अधिसूचनेतील तरतूदींच्या अनुषंगाने नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिका-यांकडून मूळ प्रमाणपत्रांआधारे त्यांची वैधता/सत्यासत्यता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, प्रस्तुत निकालाआधारे आपली शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. सदर तपासणीत तसेच ओळखपत्र पडताळणीत पात्र ठरल्यासच आपणांस विषयांकित पदावर नियुक्ती देण्यात येईल. आपण आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरल्यास आपली उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

3. विषयांकित परीक्षेच्या संवर्गातील पदांच्या शिफारशी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत.

4. अत्युच्च प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू पदावर शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारशी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 18 ऑगस्ट, 2016, तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2,दि. 11 मार्च,2019 व दि. 24 ऑक्टोबर,2019 रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित)पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक 29 जानेवारी, 2019 रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक राहील. तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा यांच्याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाची किंवा तत्पूर्वीची पोचपावती शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी अर्जात दावा केलेल्या त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल नियुक्तीपूर्वी शासनास सादर करणे अनिवार्य राहील.

5. वयोमर्यादेत सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता विचार शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधीन राहून विषयांकित परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

6.अर्जामध्ये खोटे/ चूकीचे दावे करणे, सत्य माहिती दडविणे या अत्यंत गंभीर बाबी आहेत. या संदर्भात आपले लक्ष उमेदवारांच्या सर्वसाधारण सूचना व आपण सदर परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील प्रतिज्ञा पत्राकडे वेधण्यात येत आहे.

7. साक्षांकन नमुना आयोगाच्या https://mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर साक्षांकन नमूना डाऊनलोड करुन घेण्यात यावा व संपूर्ण भरुन तो प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, (पोल-5-अ), मंत्रालय, मुंबई-400 032 यांचेकडे तात्काळ पाठवावा. साक्षांकन नमुन्यातील रकाना क्रमांक 15(1) मध्ये स्थानबध्दता, अटक, शिक्षा, दंड व इतर काही कारवाई झाली असल्याबद्दलची माहिती होय किंवा नाही या उत्तराने भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा नमुना स्वीकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

8. नियुक्तीसंदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त शासकीय प्राधिका-यांकडेच करण्यात यावा.

**आपला विश्वासू ,**

**दिलीप अ.वाघे**
**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई**